IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# विद्यार्थ्यांवर उपचारात्मक अध्यापनातून झालेल्या परिणामांचा अभ्यास

**प्रा डॉ. वंदना पी. बेंजामीन**

**कु सुरेखा रघुनाथ फुलझेले,**

पीएच. डी. मार्गदर्शिका

पीएच. डी. संशोधिका,

पदव्युत्तर शिक्षण विभाग

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापिठ नागपूर (महाराष्ट्र)**

**सारांश :-**

विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता त्याच्यातील समस्या, कच्चे दुवे, त्यांची शैक्षणिक पातळी इत्यादीचे नैदानिक चाचण्याच्या सहाय्याने निदान करुन योग्य शैक्षणिक उपचारांद्वारे त्यांच्या अध्यनातील मागासलेपणा दूर करणे म्हणजे उपचारात्मक अध्यापन होय. प्रभावी शिक्षण सुनिश्चित करणे आणि शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे यासाठी उपचारात्मक अध्यापनाची गरज आहे, ज्या प्रमाणे डॉक्टर एखादया व्यक्तीच्या रोगाचे निदान झाल्यानंतर त्यावर योग्य प्रकारे उपचार करुन लवकरात लवकर तो रोग बरा करतात, त्याचप्रमाणे शिक्षक विद्यार्थ्यांमधील दुर्बलता, न्युनत्व, समस्या त्यांची कारणे जाणून घेऊन त्यांच्या कलेने योग्य ते उपचारात्मक अध्यापन देऊन त्यांना सक्षम बनवितात, यामध्ये इतर शैक्षणिक साधनांचाही विचार केला जातो.

**कळ शब्द:-** विद्यार्थी, उपचारात्मक, अध्यापन, परिणाम, शिक्षक, अभ्यास,

**प्रस्तावना :-**

६ ते १४ वयोगटानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मिळायला हवा. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील एकही मूल अप्रगत राहणार नाही, म्हणून राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी व्हावी, तसेच भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने वर्ग निहाय अध्ययन निष्पती तयार केलेल्या आहेत. त्यांची योग्य अंमलबजावणी केल्यास गुणवत्ता दिसून येईल कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे वाचन लेखन संख्याज्ञान व संख्यावरील क्रिया या मूलभूत कौशल्यावर आधारीत कार्यक्रम आहे. इयत्ता २ री ते ८ वी मधील मूलांच्या वाचन व लेखन आणि गणिताच्या मूलभूत क्षमतांचा विकास करायचा आहे.

प्राथमिक शाळेतील १०० टक्के मुलांना वाचन लेखन व गणितीय मूलभूत क्रिया प्राप्त करणे अपेक्षित आहे. चाचणीनुसार मुलांचे वेगळे गट तयार करुन स्तरनिहाय एक तास भाषेचा व गणिताचा सराव करावयाचे आहे. मुलांच्या क्षमतेवर विश्वास ठेऊन मुलांना संधी उपलब्ध करुन दयावे. या उपक्रमातून अध्ययन स्तरात मागे असलेल्या मुलांसोबतच गोष्ट स्तरावरील व भागाकार स्तरावरील विद्यार्थ्यांना अध्ययन निष्पती नुसार अध्ययन अनुभव देणे गरजेचे आहे. या कार्यक्रमातून संपादणूक वाढीसाठी निश्चित मदत होईल.

भारताचे भवितव्य हे विद्यार्थ्यांवर अवलंबून असते. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत. विविध क्षेत्रात ते अधिकारी, नेते समाजसेवक म्हणून काम करणार आहेत. समाज आपल्याकडे असलेल्या साधन संपत्तीचा पुरेसा हिस्सा शिक्षणावर खर्च करतो. शिक्षणातील गुंतवणूक ही मनुष्यवळ मदत करणारी असते. म्हणून मानव संसाधन हा सर्व शिक्षणाचा पाया आहे. शिक्षण प्रक्रियेमध्ये विविध उद्दिष्टपूर्तो व्हावी ही अपेक्षा असते.

भाषेच्या माध्यमातून वाचन, लेखन, संभाषण, अभिव्यक्ती कौशल्याचा विकास करणे, व गणित विषयांच्या माध्यमातून बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकर, संख्याज्ञान व संख्यावरील क्रिया व व्यवहार ज्ञान इत्यादीचा विकास करणे हा उद्देश आहे. भारतीय घटनेच्या ४५ व्या कलमा नुसार प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता सारखी नसते. त्याच प्रमाणे सर्व विषयात सारखीच आवड नसते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना सर्व विषयात कमी-अधिक ज्ञान असल्याचे जाणवते. त्यामुळे काही विषयात कमी गुण मिळतात. त्यामुळे वर्गाच्या ज्या क्षमता निश्चित केलेल्या असतात. त्या क्षमताची पूर्तता करु शकत नाही. अशा विद्यार्थ्यांना पुन्हा शिकवून त्यांच्या अडचणी समस्या दूर करुन शैक्षणिक गुणवत्ता वाढविता येते, जे विद्यार्थी वर्गाच्या निर्धारीत केलेल्या क्षमता प्राप्त करु शकत नाही, अशा विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांच्या क्षमतेनुसार दररोज एक तास उपचारात्मक अध्यापन करणे अत्यंत आवश्यक आहे.

**उपचारात्मक अध्यापनाचे स्वरुप :-**

विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादनात आढळून आलेले अध्ययनातील अडथळे, उणीवा, त्रुटी च दोष दूर करून विद्यार्थ्यांची संपादणुक प्रभुत्व पातळीपर्यंत पोहचावी यासाठी केलेली योजनाबध्द कार्यवाही म्हणजे उपचारात्मक कार्यक्रम होय.

अध्यापन प्रक्रिया सराव, स्वाध्याय, चाचण्या आणि नवीन इयत्तेचा अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वीचा टप्पा, अशा विविध टप्पांवर कमी जास्त प्रमाणात उपचारात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरते. यासाठी शिक्षकांनी आपल्या अध्यापन पध्दतीबाबत क्षणभर प्रामाणिकपणे आत्मपरिक्षण करायला हवे. अध्यापनाची संबंधीत उपचारात्मक उपक्रम, कार्यक्रमाची निवड केली पाहिजे.

दैनंदिन अध्यापनामध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी संपादणुक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक कार्यक्रमाची योजना करावी, तसेच वर्गातील प्रभुत्व पातळीकडे वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी क्षमता संपादन उपचारात्मक अध्यापनाचे आयोजन केल्याने त्यांच्या क्षमता वृद्धीसाठी अधिक उपयोग होतो, अध्ययन अध्यापन प्रक्रियेत वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना विविध कृतीमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. त्यामुळे अध्ययन अनुभव प्रभावीरित्या होते, अध्ययन अर्थपूर्ण होऊन विद्यार्थ्यांची संपादणूक प्रभुत्व पातळीपर्यंत होण्यास मदत होते.

**उपचारात्मक अध्यापनाचे नियोजन:-**

पाठ्यपुस्तकाचे अध्यापन जसाजसे पुढे जाईल तसतसे सर्व क्षेत्रांमधील क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी टप्पटयाने उपचारात्मक अध्यापनाचे आयोजन करणे गरजेचे आहे. उपचारात्मक अध्यापनाचे आयोजन करण्यापूर्वी वर्गातील विद्यार्थीसंख्या अध्ययनात पुढे व मागे असणारे विद्यार्थी त्याच्यांसाठी घ्यावयाचे उपचारात्मक वर्ग यासाठी नियोजन करावे लागते.

विद्यार्थी संख्येनुरुप वर्गात विद्यार्थ्यांचे गट तयार करण्यात यावे. उपचारात्मक अध्यापनात शिक्षकांची भूमिका निरीक्षकाची असल्यामुळे त्यांच्याकडून सातत्यपूर्ण मूल्यामापन होत राहील. आणि विद्यार्थ्यांच्या संपादणुकीतील उणिवा, तृटी, अडचणी वेळच्या वेळी लक्षात येत राहतील. त्यामुळे उपचारात्मक अध्यापन योजना करणे शिक्षकांना सोईचे होईल. उपचारात्मक अध्यापनातून प्रत्यक्ष अध्ययन प्रक्रियेमध्ये मागे असणाऱ्या विद्यार्थ्याला अधिक गती घेता येते.

आधुनिक युगात नियोजनाला खूप महत्व आहे. शिक्षकाला अध्यापन साहित्य अथवा माध्यमे आपल्या अनुदेशात वापरायची झाली तर त्याने त्या साहित्याद्वारे उपयोगाचे नियोजन करावे व उपचारात्मक अध्यापन कशा प्रकारे करायचे आहे त्या प्रमाणे नियोजन करावे.

**१) शिक्षकांची तयारी :-**

उपचारात्मक अध्यापन करीत असताना शिक्षकांला स्वतःला काही तयारी करणे जरुरीचे असते. जे शैक्षणिक साहित्य अध्यापनात वापरावयाचे ठरविले आहे. त्यांचे कार्य व वापर याची माहिती करुन घ्यावी, उपचारात्मक अध्यापनासाठी शिक्षकांनी जे शैक्षणिक साहित्य वापरणार आहे. ते स्वतः नीट तपासून घ्यावेत. महत्वाचे अध्ययन अनुभव व अध्यापन मुद्दे यांची नोंद करावी. शैक्षणिक साहित्य जास्तीत जास्त चांगले वापरता येईल याचा विचार करावा. विद्यार्थ्यांची गरज व अभिरुची यांचा विचार करावा. जेणे करुन उपचारात्मक अध्यापन अधिक परिणामकारक ठरेल.

**२) वातावरण निर्मिती:-**

उपचारात्मक अध्यापन करण्याकरीता योग्य असे वातावरण निर्माण करणे अत्यंत महत्वाचे असते. अशी वातावरण निर्मिती केली नाही तर उपचारात्मक अध्यापनाची परिणामकारकता कमी होण्याची शक्यता असते. म्हणून वर्गात आनंददायी वातावरण असावे.

**३) वर्गाची तयारी:-**

उपचारात्मक अध्यापन करण्यापूर्वी अध्यापनाकरीता लागणारे शैक्षणिक साहित्य यांची पूर्वतयारी करायला हवी. लागणारे सर्व साहित्य हाताशी ठेवावे. जुळणी व मांडणी करावी प्रकाश, वायुविजन, बैठक व्यवस्था याकडे लक्ष दयावे.

**४) विद्यार्थ्यांची तयारी:-**

उपचारात्मक अध्यापन कार्य ज्या विद्यार्थ्यांसाठी करणार आहोत त्या विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक तयारी व्हावी. विद्यार्थ्यांना विषयाची पार्श्वभूमी समाजावून सांगावी. काय शिकायचे याची चर्चा करावी. नविन शब्द नविन परिभाषा याची माहिती द्यावी.

**५) शैक्षणिक साहित्याचा वापर:-**

सर्व तयारी पूर्ण झाल्यावर शिक्षकांनी प्रास्ताविक करावे, त्यानंतर उपचारात्मक अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करावा. शैक्षणिक साहित्याचा वापर करुन अध्यापन करीत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होणार नाही हे पाहावे. महत्वाच्या मुद्यांकडे लक्ष वेधावे. प्रतिपादन जोरदार पणे करावे. वेळेकडे लक्ष दयावे.

**उजळणी व मूल्यमापन:-**

उपचारात्मक अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तरे विचारावेत. विद्यार्थ्यांना आपण केलेले अध्यापन कितपत समजले हे तपासून पाहण्यासाठी चाचणी घ्यावी, गैरसमजूती दूर कराव्यात जरुरी असल्यास मूल्यमापन चाचणी घ्यावी.

**उपचारात्मक अध्यापनाचे परिणाम:-**

उपचारात्मक अध्यापनपध्दतीमुळे शिक्षकांसही अध्यापनास दिशा मिळते. आणि विद्यार्थ्यांना नेमके कोणते शैक्षणिक अनुभव द्यावयाचे व कोणत्या अनुभवावर अधिक भर देणे आवश्यक आहे. हे लक्षात येते. शिक्षकांच्या वैयक्तिक मार्गदर्शनामुळे मंदबुध्दी विद्यार्थ्यांना आपली बुध्दीमत्ता वाढविण्यास अधिक चांगला प्रयत्न करता येतो. विद्यार्थ्यांच्या दोषांचे दिग्दर्शन करुन पूढे त्यांच्याकडून ते पुन्हा होऊ नयेत म्हणून उपाय सुचविता येतात. या अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांमधील ज्ञानाचे अंतर दूर केले जातात. अध्यापन क्षमता कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून योग्य शिक्षण मिळावे लागते.

विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील उणीवा दोष दूर झाल्यामुळे विद्यार्थ्यांत शैक्षणिक विकास घडून आल्याचे दिसून येते, अशा प्रकारे उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष:-**

१) विद्यार्थ्यांच्या अडचणींचे स्वरुप भिन्न आहे.

२) उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य विकसित झाले.

३) उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थ्यांना संख्याज्ञान व संख्यावरील क्रिया करता येतात.

४) उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थ्यांत असलेला नुन्यगंड नाहिसा झाला.

५) उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थी परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम झालेत.

६) उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.

७) उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती झाली.

८) उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थ्यांची सामाजिक विकास घडून आला.

९) उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थी लेखन वाचन करतात.

१०) उपचारात्मक अध्यापनामुळे विद्यार्थी बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार इत्यादी क्रिया करता.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**

1. आंदळकर, ज. ज्ञा., अभिनव शैक्षणिक मानसशास्त्र, श्रीलेखन वाचन भांडार, पुणे.
2. करंदीकर, सुरेश, शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर
3. करंदिकर डॉ. सुरेश (2009) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र', फडके प्रकाशन कोल्हापूर
4. कुलकर्णी डी.आर (2009) 'प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र', नागपूर
5. खरात (1974) आ.पा.'प्रगत शैक्षणिक मानसशस्त्र' पुणे, श्री विद्या प्रकाशन
6. गोगटे दि.रा. (2006) शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम महाराश्ट्र जवाहर बालभवन नेताजी सुभाश मार्ग चर्नी रोड मुंबई 4000004
7. चौधरी निशिगंधा माणिकराव (2016) प्रगत षैक्षणिक महाराश्ट्र ज्ञानरचनावााद साईककृपा प्रकाषन 69/422 सिव्हिल हुडको गणेष सावेडि रोड, अहमदनगर
8. मुळे रा. श. उमाटे वि. तु (1998) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे औरंगाबाद विद्या बुक्स लिमिटेड
9. पारसनीय, न रा (2008) प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
10. पुरके वसंत (सप्टें. 2007) शिक्षण ही जगण्याची प्रेरक शक्ती लोकराज्य मुंबई माहिती जनसंपर्क महासंचालनालय.
11. सोहणी डॉ. चित्रा (मे 2007) प्रायोगिक संशोधन पध्दती माशिक ग्रंथ निर्मिती केंद्र यं.च.म.मु. वि.